# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

जा.क्र.:मका/कार्य/२०१५-२०१६/११२२ दिनांक : १/८/२०१५

## परिपत्रक

**विषय :-** एमएस.सीआटी.सहाय्यता योजना
**संदर्भ :-** मका/कार्य/२०१४-१५/४८० दि.१६/०४/२०१४

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एमएस.सीआयटी हा संगणक अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या कामगार व कामगार कुंटुबियांना MKCL या संस्थेस भरलेल्या १०० टक्के शुल्क रक्कमेच्या ५० टक्के रक्कम सहाय्यता म्हणून मंजूर करण्याची मंडळाची योजना आहे.

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये एमएस-सीआयटी परिक्षेबाबत योजनेचे परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर योजनेच्या नियम व अटीमध्ये बदल करण्यात येत असून सुधारीत नियम व अटी पुढील प्रमाणे आहेत.

### योजनेच्या नियम व अटी

१. एमएस - सीआयटी हा अभ्यासक्रम स्वतः कामगार किंवा कामगार कुटुंबियांनी उत्तीर्ण केल्यास त्यांना योजनेचा लाभ घेता येईल.
२. सदर योजनेचा एका कुटुंबातील एका व्यक्तीस एकदाच लाभ घेता येईल.
३. या योजनेकरीता अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तींना कामगार केंद्राचे सर्वसाधारण सभासद होणे आवश्यक आहे.
४. या योजनेकरीता एमएस.सीआयटी अभ्यासक्रमासाठी ६० टक्के गुण घेवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
५. एमएस.सीआयटी अभ्यासक्रमासाठी MKCL कडे भरलेल्या शुल्काची पावती जोडणे आवश्यक आहे.
६. MKCL च्या मान्यताप्राप्त संस्थेतून एमएस.सीआयटी अभ्यासक्रम पूर्ण करुन परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
७. अर्जदाराची स्वतःची/पालकाची माहे जून/डिसेंबर या महिन्याची वेतन पावती अर्जासोबत जोडावी.सदर पावती मध्ये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा कामगार कल्याण निधी कपात केल्याचा उल्लेख असावा.
८. ज्या आस्थापना कामगारांच्या वेतनाच्या पावतीमध्ये कामगार कल्याण निधी कपात केल्याचा उल्लेख करत नसतील अशा कामगारांनी आस्थापनेकडून त्यांच्या पगारातून कामगार कल्याण निधी कपात होत असल्या बाबतचा दाखला अर्जासोबत जोडावा.सदर दाखल्यात मंडळाकडील नोंदणी क्रमांक नमूद केलेला असावा.
९. कामगार कुटुंबिय सभासदांनी कामगार कुटुंबिय असल्याचे पुराव्याकरीता रेशनकार्डची प्रत सोबत जोडावी.
१०. अर्जासोबत ओळखपत्र म्हणून आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र/शाळा किंवा कॉलेजचे ओळखपत्र यापैकी एक जोडणे आवश्यक आहे.

११. अर्जदारांनी अर्ज सादर करतांना मागील १ वर्षामध्ये एमएस.सीआयटी कोर्स उत्तीर्ण केलेला असावा.

१२. अर्ज सादर करण्याची मुदत दरवर्षी १ एप्रिल ते ३१ डिसेंबर अशी राहिल.

१३. अर्जदारांनी एमएस.सीआयटी अभ्यासक्रमासाठी MKCL या संस्थेकडे नियमानुसार प्रत्यक्ष भरलेल्या एकूण शुल्क रक्कमेच्या ५० टक्के रक्कम सहाय्यता म्हणून मंजूर करण्यात येईल.

१४. या योजनेमध्ये कामगार/कामगार कुटुंबिय अपंग अर्जदार असल्यास त्यांना ५० टक्के ऐवजी १०० टक्के सहाय्यता मंजूर करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत वरील नियम व अटीप्रमाणे केंद्र प्रमुखांनी अर्ज स्विकारुन एकत्रित अर्ज दिनांक १० जानेवारी पर्यन्त गट कार्यालयास सादर करावे. गट प्रमुखांनी त्यांच्याकडे आलेले अर्ज अर्जाची तपासणी करुन एकत्रित सर्व अर्ज दिनांक १५ जानेवारी पर्यन्त विभागीय कार्यालयास सादर करावे.विभाग प्रमुखांनी या योजनेच्या नियम व अटीनुसार,गुणांच्या मेरीटनुसार व अर्थसंकल्पाच्या तरतुदीनुसार दिनांक ३१ जानेवारी पर्यन्त मंजूरी द्यावी.त्यानंतर केंद्र व गट प्रमुखांनी विभागीय कार्यालयास बिले सादर करुन माहे फेब्रुवारी च्या आत सभासदांना रक्कम धनादेशाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

सदरचे परिपत्रक **सन २०१५-१६** या चालू आर्थिक वर्षापासून पुढील आदेश निघेपर्यन्त अंमलात राहील.तसेच सदर खर्च **''संगणक अवरनेस (एमएस -सीआयटी) ''** या सदरी खर्ची घालण्यात यावा.

सोबतः-अर्जाचा नमुना

कल्याण आयुक्त.

प्रत,

१) सर्व अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

२) सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त /सर्व विभागीय कार्यालये/ कामगार क्रिडा भवन,मुंबई

३) कामगार विकास अधिकारी, कामगार कल्याण भवन,नागपूर/पुणे

४) सहाय्यक लेखा अधिकारी सर्व विभागीय कार्यालये

५) कामगार कल्याण अधिकारी,१८ गट कार्यालये. ★★★

६) केंद्र प्रमुख, सर्व केंद्र

★★★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन दयावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
## एमएस-सी.आय.टी. सहाय्यता योजना अर्ज

| | | |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नांव( प्रथम आडनाव) | |
| २ | सध्याचा राहण्याचा पत्ता ( रेशनकार्ड प्रमाणे ) | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | ई-मेल आयडी | |
| ५ | आधार कार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळख पत्र/शाळा/कॉलेजचे ओळखपत्र क्रमांक (सत्यपत सोबत जोडावी) | |
| ६ | अर्जदार एमएस-सीआयटी परिक्षा उत्तीर्ण झाला त्याचा महिना व वर्ष | महिना :<br>वर्ष : |
| ७ | अर्जदार एमएस-सीआयटी परिक्षा ज्या संस्थेमधून उत्तीर्ण झाला त्यांचे नांव व पत्ता | |
| ८ | एमएस-सीआयटी परिक्षेतील एकुण गुण व टक्केवारी | मिळविलेले एकुण गुण पैकी<br>टक्केवारी |
| ९ | स्वतः किंवा पालक नोकरी करीत असलेल्या कारखाना/ कंपनीचे, आस्थापनाचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक | नाव :<br>पत्ता :<br>दूरध्वनी क्र. : |

(टिपः- अर्जदारांनी वरीलप्रमाणे अर्ज परिपूर्ण भरावा व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावी अन्यथा अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही.)

---

प्रतिज्ञापत्र

मी कु./कुमारी............................................. लिहून देतो/देते कि,मला महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सर्व नियम व अटी मान्य असुन मी सादर केलेली उपरोक्त माहिती सत्य आहे. ती तपासणीत सदोष अढळल्यास अर्ज नाकारण्याचा अधिकार मंडळाला असेल.

दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी :

ठिकाण :- पालकांची स्वाक्षरी :

---

(कार्यालयीन उपयोगाकरिता)

केंद्राचे नांव/शिक्काः सर्वसाधारण सभासद क्र............... दिनांक................

केंद्र प्रमुखांची स्वाक्षरी

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. एमएस- सीआयटी परिक्षा किमान ६० टक्के उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकीत झेरॉक्स प्रत.
२. स्वतः किंवा पालक ज्या आस्थापनेत काम करतात तेथील माहे जुन / डिसेंबर ची पगार स्लीपची साक्षांकीत झेरॉक्स प्रत. ( त्यात कामगार कल्याण निधि कपात असावी. पगार स्लीप मिळत नसेल तर तेथील व्यवस्थापकाच्या सहीचा निधी कपातीचा दाखला मंडळाच्या नोंदणीकृत क्रमांकासह जोडावा.)
३. एमएस- सीआयटी परिक्षेकरीता भरलेल्या फीच्या पावतीची साक्षांकीत सत्यप्रत.
४. रेशन कार्ड / निवडणुक ओळखपत्र/आधार कार्ड/शाळा किंवा कॅालेजचे ओळखपत्र सत्यप्रत
५. रेशन कार्डाची साक्षांकीत सत्यप्रत